**<u>प्रेस नोट</u> दिनांक १३/०४/२०१९**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन हद्दीतील दोन सराईत गुन्हेगारांवर पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी केली एमपीडीए प्रमाणे कारवाई**

---

बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ताडीवाला रोड भागात सराईत गुन्हेगार सागर उर्फ यल्ल्या इराप्पा कोळानट्टी, रा. दुष्काळ झोपडपट्टी, ताडीवाला रोड, पुणे व शगुन राजु जोगदंड रा. बालमित्र तरूण मंडळाजवळ, १३ ताडीवाला रोड, पुणे या गुन्हगारांची दहशत होती. ते टोळक्यासह दहशत माजवून दरोडा घालणे, मारहाण करणे, शस्त्रांचा धाक दाखवणे, सर्व सामान्य लोकांच्या साहित्यांची तोडफोड करणे अशा प्रकारचे गंभीर गुन्हे दोघांचेविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दाखल आहेत.

सराईत गुन्हेगार सागर उर्फ यल्ल्या इराप्पा कोळानट्टी व शगुन राजु जोगदंड या दोघांनाही यापूर्वी पुणे शहर व पुणे जिल्हयातुन तडीपार केले होते. तडीपार आदेशास न जुमानता, तडीपार कालावधीतही त्यांनी गंभीर स्वरूपाचे गुन्हे केले होते.

नमुद दोन्ही सराईत गुन्हेगारांमुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस धोका निर्माण झाल्याने, त्यांचेवर ठोस कारवाई करणे आवश्यक होते. म्हणून नमुद दोन्ही सराईत गुन्हेगांराना मा. पोलीस आयुक्त साो.पुणे शहर श्री.डॉ. के. वेंकटेशम् यांनी एमपीडीए कायद्यांन्वये ०१ वर्षाकरीता स्थानबध्द केले असुन त्यांची रवानगी, येरवडा कारागृह, पुणे येथे केलेली आहे.

सदरची कारवाई पोलीस सह-आयुक्त श्री शिवाजी बोडखे, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे श्री रविंद्र सेनगांवकर, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ श्री. बच्चन सिंह, सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, डॉ.प्रिती टिपरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एम.एम.मुजावर, पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री. दिगंबर शिंदे, तपास पथकाचे सहा.पोलीस निरीक्षक श्री. संदिप जमदाडे, पो.हवा.संतोष पागार, पोलीस शिपाई किरण तळेकर यांनी केली आहे..

(एम.एम. मुजावर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे